### तोंडांची स्वपरीक्षा

- शरीरातील इतर भागाच्या कर्करोगाच्या निदानसाठी जशी महागडी उपकरणे किंवा अद्ययावत यंत्रणा लागते तशी तोंडातील कर्करोगच्या निदानासाठी लागत नाही.
- तोंडाचे स्वपरीक्षण केल्यास कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे ओळखता येतात.

### तोंडाचे स्वपरीक्षण कसे कराल ?

प्रथम पाण्याने चूळ भरुन तोंड साफ करा, नंतर आपले तोंड आरशासमोर स्वच्छ प्रकाशात उघडा व त्यात पांढरे किंवा लाल डाग आहेत की नाही ते पहा, न भरण्याऱ्या जखमा तपासा किंवा तोंड उघडायला त्रास होतो का ते बघा.

जर तुम्हाला तोंडाच्या कर्करोगाची पूर्व लक्षणे तुमच्या तोंडात आढळली तर त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधा.

### तुम्हाला तंबाखू सोडण्याची इच्छा आहे पण सोडू शकत नाही?

सहाजिकच आहे कारण याला तंबाखूमधील घटकांपैकी निकोटीन हा पदार्थ कारणीभूत आहे. तंबाखू मधील निकोटीन नामक पदार्थ चरस व गांजा पेक्षा अधिक हानिकारक आणि व्यसनकारक आहे.

तंबाखूच्या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करु शकतो.

अधिक माहितीसाठी येथे संपर्क साधा

तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र

कर्करोग प्रतिबंध विभाग

**कॅन्सर एपिडेमियोलॉजी सेंटर**
**टाटा स्मारक केंद्र**

प्रिवेंटिव ऑन्कोलॉजी क्लिनिक
रुम नंबर. ३०३, तिसरा मजला
शांती सदन, ॲक्ट्रेक
सेक्टर- २२, खारघर
नवी मुंबई - ४१०२१०

**“जिवनाला स्विकारा कर्करोगाला नाकारा”**

**कर्करोगाची ओळख पटकन,**
**कर्करोग - मुक्त होऊ शकतो चटकन**

# तंबाखू आणि कर्करोग




**“जीवनाला स्वीकारा कर्करोगाला नाकारा”**

जनहितार्थ लागू

तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र

**कॅन्सर एपिडेमियोलॉजी सेंटर**
**टाटा स्मारक केंद्र**

प्रिवेंटिव ऑन्कोलॉजी क्लिनिक
रुम नंबर. ३०३, तिसरा मजला
शांती सदन, ॲक्ट्रेक
सेक्टर- २२, खारघर
नवी मुंबई - ४१०२१०

# तुम्हाला माहीत आहे का?

- भारतात सध्या ३,७७,८३० प्रौढ तंबाखू (धूम्रपान केलेले आणि/किंवा धूम्रपानरहित) वापरतात.
- तंबाखू संबंधित कर्करोग भारतातील सर्व कर्करोगांपैकी ४०% असल्याचा अंदाज आहे.
- भारतात दरवर्षी १३,५०,००० लोकांचा तंबाखू सेवनामुळे मृत्यु होतो.

## तंबाखूचे दुष्परिणाम

- **कर्करोग**
  - तंबाखू सेवनाने तोंड, नाक, स्वरयंत्र, अन्ननलिका व फुप्फुसाच्या कर्करोगाची शक्यता वाढते.
  - स्वादुपिंड, मूत्राशय, मुत्रपिंड, पोट व गर्भाशय मुखाच्या कर्करोगासदेखील तंबाखू हा सहाय्यक घटक असतो.
- **हृदयाचे विकार**
  - उच्चरक्तदाब (B.P.), छातीत दुखणे (Angina)
- हृदयविकाराचा झटका (Heart attack)
- **अर्धांगवायू** (Paralysis)
- **श्वसनाचे विकार** (Bronchitis)
  - **इम्फेसिमा** (Emphysema)
  - **ब्रोंकाइटीस्** (Bronchitis)
- **इतर रक्तवाहिन्यांचे विकार**

  **(Peripheral Vascular Diseases)**
  - हाता पायाचा रक्तप्रवाह कमी होणे, ज्यामुळे हातापायात कळा येणे व गँगरीन (Gangrene), होऊन बोटे गळून पडणे.
- **नपुंसकत्व**

## तंबाखू सेवन : काही निखळ सत्ये

- कोणत्याही प्रकारची सिगारेट सुरक्षित नसते, फिल्टर, मेंथॉलयुक्त, परदेशी, कमी निकोटीन युक्त सर्वच सिगारेट धोकादायक असतात.
- पानातून, जरद्यातून, गुटख्यातून, मशेरीतून किंवा तंबाखूयुक्त पेस्ट यापैकी कोणत्याही प्रकाराने केलेले तंबाखू सेवनही सुरक्षित नसते.
- विड्या ह्या सिगरेट पेक्षा कमी धोकादायक नसतात.

Source: https://www.who.int/india/health-topics/tobacco,
https://ncdirindia.org/All_Reports/Report_2020/resources/Chapter14ProjectionofCancerCasesinIndia.pdf

## मुख कर्करोगासाठी धोक्याच्या सूचना

तोंडाचा कर्करोग होण्यापूर्वी, आपले शरीर काही धोक्याचे इसारे देत असते. त्यांना कर्करोगाची पूर्वावस्था असे म्हणतात. पुढे त्याचे रुपांतर कर्करोगामध्ये होते.

**क) तोंडातील सफेद डाग**

(Leucoplakia) : साधारणपणे, तंबाखू ज्या ठिकाणी तोंडात ठेवला जातो तेथे पांढरे चट्टे किंवा डाग आढळतात.



**ख) तोंडातील लाल चट्टे** (Erythroplakia):

गुलाबी किंवा लालसर रंगाचे चट्टे आढळतात

**ग) जबड्याची लवचिकता कमी होणे.** (Submucous Fibrosis):



१) या अवस्थेत तोंड पूर्ण उघडण्यास त्रास होतो.

२) तिखट किंवा मसालेदार पदार्थ खाल्याने तोंडात जळजळ होते.

**घ) तोंडातील बरे न होणारे व्रण/जखमा** (Ulcer):

सहसा हे व्रण सतत वाढणारे, लवकर बरे न होणारे व न दुखणारे असतात.



## तोंडाच्या व घशाच्या कर्करोगाच्या निदानकरीता चाचण्या

- **बायॉप्सी (Biopsy)**

  प्रादुर्भाव झालेल्या भागात छोटा तुकडा काढतात व त्याचे सूक्ष्मदर्शक यंत्रामार्फत परीक्षण केले जाते.
- **स्वरयंत्राची तपासणी :**

  डॉक्टर तोंडातून आरसायुक्त दुर्बिण घालून स्वरयंत्राच्या कर्करोगासाठी तपासणी करतात.
- **एफ एन ए सी (FNAC)**

  मानेतील गाठीचा सुईद्वारे तपासणी केली जाते.